दैनिक

# मराठवाडा पत्र

● छ.संभाजीनगर, बीड, जालना, नांदेड, परभणी, धाराशिव, लातूर ●

बुधवार

२२.१.२०२५

वर्षे : ४ अंक : २८६

किंमत : ३ रु. पाने : ४

संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे

marathwadapatra.com dailymarathwadapatra2021@gmail.com RNI : Reg.NO.MAH/MAR/2021/80074 Post : Reg.No. L/226/RNP/Renewal/2025-2027 Mob : 9822152955 पान -१




# बीड हत्याकांडातील सर्व आरोपी एका फ्रेममध्ये

## खंडणी प्रकरणातील सीसीटीव्ही समोर ; वाल्मीक कराड,विष्णू चाटेसह पोलिस अधिकारीही उपस्थित

बीड, (प्रतिनिधी): - बीडच्या मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख हत्या प्रकरणाशी निगडीत खंडणी प्रकरणी एक मोठी अपडेट समोर आली आहे. आवादा कंपनीच्या अधिकाऱ्यांना खंडणी मागितली त्या दिवसाचे सीसीटीव्ही फुटेज समोर आले आहे. संतोष देशमुख हत्याकांड आणि खंडणी प्रकरणातील सर्व आरोपी या सीसीटीव्हीच्या फ्रेममध्ये एकत्र कैद झाले आहे. उल्लेखनीय बाब म्हणजे काही पोलिस अधिकारीही त्यांच्यासोबत दिसत आहेत. हे सीसीटीव्ही फुटेज मोठा पुरावा मानले जात आहे. मिळालेल्या माहितीनुसार, हे सीसीटीव्ही फुटेज केज शहरातील विष्णू चाटे याच्या कार्यालयासमोरील दुकानाबाहेरील आहे. आवादा कंपनीला २९ नोव्हेंबर २०२४ रोजी खंडणी मागितली होती. तत्पूर्वी विष्णू चाटे याच्या कार्यालयात बैठक झाली. त्याच दिवशीचे हे सीसीटीव्ही फुटेज आहे. २९ नोव्हेंबरला वाल्मिक कराड या कार्यालयात आला होता. यावेळी वाल्मिक कराड याच्यासोबत संतोष देशमुख यांची निर्घृणपणे हत्या करणारे प्रतीक घुले, सुदर्शन घुले यांसह त्याचे मित्र दिसत आहेत. विशेष म्हणजे संतोष देशमुख हत्याप्रकरणामुळे निलंबित झालेले पीएसआय राजेश पाटील हे देखील यावेळी आरोपींसोबत असल्याचे सीसीटीव्ही फुटेजमध्ये दिसत आहे.



### २९ नोव्हेंबरला वाल्मिक कराड केज शहरात

वाल्मिक कराड याने विष्णू चाटेटेच्या मोबाईलवरून आवादा कंपनीच्या अधिकाऱ्यांना २ कोटी रुपयांची खंडणी मागितल्याचा आरोप आहे. त्यामुळे हा व्हिडिओ महत्त्वाचा समजला जात आहे. २९ नोव्हेंबर २०२४ रोजीचा सकाळी अकरा वाजताचा हा व्हिडिओ आहे. यानंतर आवादा कंपनीकडे खंडणी मागितल्याचा प्रकार घडला असल्याचा संशय आहे. २९ नोव्हेंबरला वाल्मिक कराड केज शहरात होता, याचा हा पुरावा देखील आहे. खंडणी आणि हत्या प्रकरणातील काही आरोपी यामध्ये दिसत आहेत.

### हत्येच्या दिवशी आरोपींची फोनाफोनी

संतोष देशमुख यांची गत ९ डिसेंबर रोजी अपहरण करून हत्या करण्यात आली होती. आरोपी आता कोठडीमध्ये असून या प्रकरणाचा एसआयटी तपास करत आहे. कृष्णा आंधळे हा एकमेव आरोपी अद्याप फरार आहे. संतोष देशमुख यांची हत्या झाली, त्यादिवशी विष्णू चाटे, सुदर्शन घुले आणि वाल्मीक कराड यांच्यात फोनवर संभाषण झाल्याचा दावा पोलिसांनी कोर्टात केला होता. संतोष देशमुख यांच्या अपहरणाची वेळ आणि आरोपींची फोनाफोनीची वेळ मिळतीजुळती असल्याचेही पोलिसांनी कोर्टात म्हटले होते.

# चोरीच्या तब्बल ६३ मोबाईलसह कार जप्त!

अंबाजोगाई, (प्रतिनिधी):- साप्ताहिक सुटी असल्याने बीडहून अंबाजोगाईला आलेले पोलीस कर्मचारी तेजस वाहुळे यांना बस स्थानकात एका तरुणाच्या हालचाली संशयास्पद वाटल्याने त्याच्यावर पाळत ठेवली. त्यानंतर कारमध्ये निघालेल्या त्या चोरट्याचा पाठलाग करून वाहुळे यांनी त्यास पकडले असता त्याच्याजवळ चोरीचे तब्बल ६३ मोबाईल आढळून आले. यावेळी त्या चोरट्याचे तिघे साथीदार मात्र पलायन करण्यात यशस्वी झाले. ही घटना मंगळवारी (दि.२१) दुपारी अंबाजोगाई शहरात घडली. तेजस वाहुळे सध्या बीड पोलीस मुख्यालय कर्तव्य बजावत आहेत. अधिक माहिती अशी की, साप्ताहिक सुटी असल्याने वाहुळे अंबाजोगाईत आले होते. दुपारी मुलाची शाळा सुटेपर्यंत वाट पाहत ते बस स्थानकात थांबले होते. यावेळी एका तरुणाच्या हालचाली संशयास्पद वाटल्याने तो पाकीटमार किंवा मोबाईल चोर असून शकतो अशी खात्री झाल्याने वाहुळे यांनी त्याच्यावर पाळत ठेवली. थोड्यावेळात तो तरुण लगबगीने बस स्थानकच्या बाहेर पडला आणि रस्त्यावर थांबलेल्या एका कारमध्ये बसलेल्या तीन साथीदारांसह लगबगीने निघाला. वाहुळे यांनी तत्काळ एका ऑटोरिक्षातून त्या कारचा पाठलग सुरु केला. आपल्या पाळतीवर कोणी येत असल्याची



अजिबात कल्पना नसलेल्या त्या चोरट्यांनी कार भगवानबाबा चौकातील पंपावर सीएनजी भरण्यासाठी थांबवली. यावेळी तिघेजण काह्मी उतरले तर एकजण कार जवळच थांबला. पाठलाग करत आलेल्या वाहुळे यांनी कारजवळ थांबलेल्या चोरट्यास पकडले आणि चौकशी सुरु केली. यावेळी त्याच्यासोबतचे तिघे पळून जाण्यात यशस्वी झाले. पोलीसी खाक्या दाखवताच त्या चोरट्याने तो स्वतः नागपूरचा असून सोबतचे तिघे साथीदार झारखंडचे असल्याचे सांगून आत्ता बस स्थानकातून एक मोबाईल चोरला असल्याचे कबूल केले. त्यानंतर वाहुळे यांनी कारची झडती घेतली असता आतमध्ये तब्बल ६३ मोबाईल आढळून आले. वाहुळे यांनी मोबाईल आणि कारसह त्या चोरट्याला शहर पोलिसांच्या स्वाधीन केले. या कामगिरीबद्दल तेजस वाहुळे यांचे कौतुक होत आहे.

# छत्रपती शिवाजी महाराज चौक ते बार्शी नाका रस्ताकामाला लकवरच सुरूवात

## आ.संदीप क्षीरसागरांच्या प्रयत्नांना यश

बीड,(प्रतिनिधी):- बीड शहरातील बिंदुसरा नदीवर पूल कम बंधारा तसेच छत्रपती शिवाजी महाराज चौक ते बार्शी नाका पर्यंतचा मुख्य रस्ता होण्यासाठी आ.संदीप क्षीरसागर हे गेल्या अनेक वर्षांपासून सातत्याने पाठपुरावा करत आहेत. या कामाची निविदा प्रक्रिया झाली असून आता निवड झालेल्या कंत्राटदार कंपनीला विभागाकडून स्वीकृती पत्र देण्यात आले आहे. त्यामुळे लवकरच या कामाला प्रत्यक्ष सुरूवात होणार आहे. मागील टप्प्यातच जरूड ते बार्शी नाका व छत्रपती शिवाजी महाराज चौक ते शिरापूर धुमाळ या रस्त्यांसाठी तब्बल २१३ कोटी रूपयांचा निधी आ.संदीप क्षीरसागर यांच्या प्रयत्नातून मंजूर होऊन कामदेखील जवळपास पूर्ण झाले आहे. परंतु शहरातील मुख्य असलेला बार्शी नाका ते छत्रपती शिवाजी महाराज चौक पर्यंतचा रस्ता नव्याने व्हावा याकरिता



आ.क्षीरसागर गेल्या अनेक दिवसांपासून प्रयत्नशील होते. याबाबत केंद्रीय रस्ते व परिवहन मंत्री नितीन गडकरी, महामार्ग विकास प्राधिकरण यांच्याकडे सातत्याने पाठपुरावा, मागणी करून शेवटी या आ.क्षीरसागरांच्या प्रयत्नातून या कामाला मंजुरी मिळाली आहे. महामार्ग ३६१ (४७+००० ४९+५००) २.५ (अडीच) किलोमीटर लांबी अंतर असलेल्या महामार्गाचे चौपदरीकरण, आणि नाली बांधकाम व बार्शी नाक्याजवळील बिंदुसरा नदीवर पूल कम कोल्हापूरी बंधारा बांधणे अशा स्वरुपातील हे काम असणार आहे. राष्ट्रीय रस्ते विकास प्राधिकरण व राष्ट्रीय महामार्ग विभाग यांच्याकडून याकामासाठी ४८ कोटी ८५ लाख रूपयांचा निधी मंजूर झाला आहे. सदरील कामाची निविदा प्रक्रिया पूर्ण झाली आहे. तसेच सार्वजनिक बांधकाम विभागाचे मुख्य अभियंता (राष्ट्रीय महामार्ग) कोकण भवन, मुंबई यांच्याकडून कंत्राटदार कंपनीला स्वीकृती पत्र देण्यात आले आहे. यानंतर लवकरच कार्यारंभ आदेश होऊन कामाला प्रत्यक्ष सुरूवात होणार आहे. लवकरच कामाला प्रत्यक्ष सुरूवात होणार आहे. या रस्त्यामुळे रहादारीसाठी तर बिंदुसरा नदीवरील बंधार्यामुळे बीड परिसरात सिंचन आणि पाणी उपलब्धतेसाठी मोठा फायदा होणार आहे. आ.संदीप क्षीरसागर यांच्या प्रयत्नांतून बीडसाठी अतिशय फायदेशीर असलेले हे काम लवकरच होणार आहे.

### पूल कम बंधाऱ्याचा सिंचन आणि पाणी साठवण्यासाठी मोठा फायदा

बिंदुसरा नदीवरील पूल कम कोल्हापूरी बंधार्यामुळे बीड शहर आणि आजूबाजूच्या साधारण ५ किलोमीटर पर्यंतच्या परिसरात पाणी पातळीत वाढ होणार असा तांत्रिक अंदाज आहे. बीड जिल्ह्यात पावसाची अनियमितता असल्याने प्रत्येक उन्हाळ्यात पाणीटंचाईची परिस्थिती निर्माण होते. परंतु या कोल्हापूरी बंधार्यामुळे पाणी साठवणूक होईल. परिणामी पाणी उपलब्धता आणि शेती सिंचनासाठी याचा खूप मोठा फायदा परिसरात होणार आहे. बिंदुसरा नदीवर बंधारा कम पूल ही संकल्पना मोठी दूरदर्शी होती. ती आ.संदीप क्षीरसागर यांनी डोळ्यासमोर ठेवून हे काम होण्यासाठी निरंतर प्रयत्न केले. शासन आणि प्रशासन स्तरावर सातत्याने पाठपुरावा केला. अनेकवेळा अधिवेशनातही हा मुद्दा मांडला. दरम्यान आता आ.संदीप क्षीरसागरांच्या प्रयत्नांना यश आले असून लवकरच हे काम पूर्ण झालेले असेल.

# सार्वजनिक वितरण प्रणालीमध्ये आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करावा-खा.बजरंग सोनवणे

बीड, (प्रतिनिधी):- ग्रामीण भागातील सार्वजनीक वितरण प्रणालीमध्ये तंत्रज्ञानाचा वापर केल्यास अधिक पारदर्शकता येऊन ग्रामीण भागातील सामान्य नागरिकांना याचा फायदा होईल, असे मत संसदीय स्थायी समितीचे सदस्य व बीडचे खा.बजरंग सोनवणे यांनी व्यक्त केले. भारत सरकारच्या ग्राहक संरक्षण, खाद्य आणि सार्वजनिक वितरण संबंधीत संसदीय स्थायी समितीची बैठक ताजमहाल पॅलेस, मुंबई येथे संपन्न झाली. यावेळी ते बोलत होते. राष्ट्रीय अन्न सुरक्षा कायदा २०१३, अत्यावश्यक वस्तू अधिनियम १९५५, ग्राहक संरक्षण कायदा २०१९ व सार्वजनिक वितरण प्रणाली (नियंत्रण) आदेश २०१५ या नियमावलीवर झालेल्या चर्चेमधे सक्रीय सहभाग नोंदवत ग्रामीण भागातील सार्वजनिक वितरण व्यवस्थेतील समस्या पोटतिडकीने मांडल्या. केंद्र सरकारने माजी केंद्रीय मंत्री कनिमोळी करुणानिधी यांचे अध्यक्षतेखाली संसद सदस्यांची संसदीय समिती नियुक्त केलेली आहे. यात खा.बजरंग सोनवणे यांचा समावेश आहे. ही समिती खाद्य,

संसदीय समितीची मुंबईत बैठक



सार्वजनिक वितरण आणि ग्राहक संरक्षण या राष्ट्रीय महत्वाच्या विषयावर संपूर्ण देशात दौरे करत असते. प्रचलित कायद्यामधे सुधारणा करणे, जिथे नियमांचे उल्लंघन होत असेल तर कारवाई करणे, ग्राहक अधिकारांचे संरक्षण करणे यावर नियंत्रण समिती ठेवते. स्वस्त धान्य दुकानामार्फत वितरित होत असलेल्या अन्न-धान्य वितरण करत असताना त्यात अधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करुन अधिक पारदर्शकता आणने आवश्यक आहे, असेही खा.सोनवणे म्हणाले. याच बरोबर देशात खाद्य प्रक्रिया उद्योग गतीने वाढत असल्यामुळे भारतीय मानक ब्युरोचे कार्यात गती देण्याच्या सूचना देत लहान मुलांना देण्यात येत असलेल्या विविध खाद्य पदार्थातील साखर नियंत्रित करण्याचा कायदा प्रभावी करण्याचे मत मांडले. बैठकीस समितीच्या अध्यक्षा माजी मंत्री एम.के.कनिमोळी यांचेसह समितीचे सर्व सदस्य एफएसएसएआय, भारतीय मानक ब्युरोचे व सर्व पेट्रोलियम कंपन्यांचे जबाबदार अधिकारी उपस्थित होते.

# बीड जिल्ह्यात ३४२३ पैकी ७२५ फळबागा बोगस

## जिल्हाप्रशासनाचे गृह विभागाच्या अपर मुख्य सचिवांना पत्र-डॉ.गणेश ढवळे

बीड,(प्रतिनिधी):- राज्यातील मृग बहार २०२४ योजनेंतर्गत बोगस फळबाग पिक विमा प्रकरणात शासनाची दिशाभूल व आर्थिक फसवणूक करणाऱ्या बीड जिल्ह्यातील संबंधितांवर फौजदारी गुन्हे दाखल करण्यात यावेत अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर यांनी जिल्हाधिकारी बीड यांना केल्यानंतर त्या निवेदनाच्या अनुषंगाने बीड जिल्हाधिकारी कार्यालयामार्फत तहसीलदार महसूल -१ अविनाश शिंगटे यांनी महाराष्ट्र शासन गृह विभागाचे अपर मुख्य सचिव यांना संदर्भीय निवेदनाची प्रत उचित कार्यवाहीस्तव पाठवली असुन खरंच संबंधित दोषींवर फौजदारी गुन्हे दाखल करण्यात येणार आहेत की नेहमीप्रमाणेच हा सुद्धा चौकशीचा फार्स ठरणार आहे अशी शंका डॉ.गणेश ढवळे यांनी उपस्थित केली आहे. प्रधानमंत्री पीक विमा योजना खरीप २०२४ व



पुनर्रचित हवामान आधारित फळपीक विमा योजना मृग बहार २०२४ मधील विमा संरक्षित क्षेत्राची कृषी आयुक्तालयातील पथकांमार्फत क्षेत्रीय पडताळणी करण्याचे केंद्र शासनाने निर्देश दिले होते.त्या अनुषंगाने १६ ते १८ आक्टोबर २०२४ या कालावधीत बीडसह ईतर जिल्ह्यातील निवडक तालुक्यात विमा सहभागी शेतकऱ्यांच्या क्षेत्राची पडताळणी करण्यात आली होती.या तपासणी पथकामध्ये कृषी उपसंचालक, तंत्र अधिकारी, कृषी अधिकारी व कृषी पर्यवेक्षक यांचा समावेश होता.पथकांमार्फत बीड, जालना, अहिल्यानगर, छत्रपती संभाजीनगर, जालना व सांगली या जिल्ह्यांमध्ये तपासणी करण्यात आली होती.सदरील मोहिमेत एकुण ३६१ फळबागांची तपासणी करण्यात आली होती.या तपासणी मध्ये फक्त १४८ ठिकाणीच योग्य फळबागा आढळून आल्या होत्या.

### ३४२३ पैकी ७२५ फळबागा बोगस

पुनर्रचित हवामान आधारित फळ पिक विमा योजना मृगबहार सण २०२४ मध्ये विमा भरलेल्या बीड जिल्ह्यातील ३४२३ अर्जदारांच्या क्षेत्रावर जाऊन तपासणी केली जात आहे. तपासणी दरम्यान आतापर्यंत ७२५ ठिकाणी फळबागा नसणे, अधिकचे क्षेत्र दाखवणे, झाडे लहान असणे अशी प्रकरणे समोर आली आहेत. ही सर्व बोगस प्रकरणे विमा कंपनीने रद्द करावी अशी सूचना जिल्हास्तरीय समितीने संबंधित विमा कंपन्यांना केली आहे. अद्याप ७०टक्के तपासणी झाली असून १०० तपासणी झालेली नाही. पुढील कालावधीत विमा काढलेल्या प्रत्येक ठिकाणी जाऊन तपासणी केली जाणार आहे सर्व तपासणी झाल्यानंतर हा अहवाल पुढे कृषी आयुक्तालयास पाठविण्यात येणार आहे.

### फळबागांची तपासणी अहवाल

आष्टी तालुक्यातील केरूळ, कडा, धामणगाव, बिरंगुळवाडी या गावातील ४० ठिकाणी प्रतिनिधिक स्वरूपात फळबाग पीक तपासणी केली असता १८ योग्य अर्ज आढळले होते. ३ ठिकाणी फळपीक बाग आढळली नाही. प्रत्यक्षात लागवड क्षेत्रापेक्षा जास्त क्षेत्र विमा घेतलेल्या अर्जांची संख्या १६ तर तपासणी वेळी शासन निर्णयानुसार निश्चित केलेल्या उत्पादनक्षम वयापेक्षा कमी वय आढळलेल्या अर्जांची संख्या ०३ आढळली होती.त्यानंतर जिल्हा तपासणी सुरू झाली.

# तलवाड्यात पकडला गुटखा; दोन लाखांचा मुद्देमाल जप्त

बीड, (प्रतिनिधी): -गेवराई तालुक्यातील तलवाडा पोलीस स्टेशन हद्दीतील तलवाडा येथे एका गुटखा माफीयाच्या टाटा इंडिगो कंपनीच्या गाडीमध्ये विविध कंपनीचा गुटखा असल्याची तलवाडा पोलीस स्टेशनचे सपोनि सोमनाथ नरके यांना गोपीनिय माहिती मिळताच (दिं २०) रोजी पाच वाजता पोलिसांचा फौज फाटा घेऊन स्पॉटला पोहोचले व होडीची तपासणी केली असता टाटा इंडिको कंपनीची क्र. एमएच २१ व्हि ५००१ या गाडीत विविध कंपनीचा गुटखा आढळला आहे. या प्रकरणी तलवाडा पोलीस स्टेशनचे बीट अंमलदार नारायण काकडे यांच्या फिर्यादीवरून कलम२७४, २७५, १२३, प्रमाणे भारतीय न्याय दंड संहिता प्रमाणे शेख सद्दाम मुसा (रा, तलवाडा ता गेवराई) यांच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. एकूण दोन लाख ३३ हजार ८० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. या प्रकरणी सपोनि सोमनाथ नरके यांच्या मार्गदर्शनाखाली पुढील तपास उपनिरीक्षक कोळी करीत आहे.

